**निशाणी क्रमांक – २८**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०१</u>**

माझे नाव – शिवाजी किशन मोरे,
वय – ४२ वर्षे धंदा – शेती,
रा. कारेगाव, ता.लोहा, जि.नांदेड.

**<u>शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एन. ए. भांगे.</u>**

**(फौजदारी प्रकिये संहितेच्या कलम २९९ अन्वये)**

**०१.** आरोपी माझ्या ओळखीचे नाहीत. आरोपी समोर आल्यास मी ओळखू शकणार नाही. झोपमध्ये मला मारहाण झाली होती. ते माणसं कोण होते ते मला आठवत नाही. घटनेबाबत इतर मी काहीही सांगू शकत नाही. मी पोलीस स्टेशनला फिर्याद दिली होती किंवा कसे ते मला माहीत नाही. मी त्यावेळी कोमात होतो. आता मला फिर्याद दाखवण्यात आली. त्यावर माझी सही नाही. त्यातील मजकुर मला माहीत नाही. पोलीसांनी माझा पुरवणी जबाब घेतला नव्हता. माझी आरोपींविरूध्द तक्रार राहिलेली नाही. मला केस पुढे चालवायची नाही.

**<u>साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्यामुळे अभियोग पक्षाच्या विनंतीवरुन फौ.प्र.संहितेवरुन कलम १५४ अन्वये सुचक प्रश्न विचारण्यास परवानगी देण्यात आली.</u>**

**०२.** हे म्हणणे खरे नाही की, दि.३०/०३/२००४ रोजी मी माझी ट्रक एम.एच. क्र.२६ ८१२८ ही घेऊन रायपूर येथुन गजाळी भरून सांगली येथे निघालो होतो. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०५.०४.२००४ मी नांदेड येथे आलो, माझ्यासोबत राजेश सुर्यवंशी हा क्लिनर होता. हे म्हणणे खरे नाही की, दुपारी चार वाजता ट्रक घेऊन मी सांगलीला जाण्यास निघालो व कारेगाव येथे मी जेवण केले. हे म्हणणे खरे नाही की, मी रात्री ८.०० वाजता सांगलीकडे जाण्यास निघालो. हे म्हणणे खरे नाही की, मी माझी ट्रक घेऊन अहमदपूर मार्गे जात असताना दिनांक ०६.०४.२००४ रोजी शिरूर ताजबंद येथील लातूर रोडवरील धाब्यावर माझी ट्रक लावून झोपी गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, रात्री अंदाजे १.०० वाजण्याच्या सुमारास माझ्या मालकाचे जावाई आरोपी क्र.३ व त्याच्यासोबत आरोपी क्र.१ व २ हे तिघे ट्रक नं.एम एच २६ बी ७२७८ हा ट्रक घेऊन आले व त्यांनी मला उठवून मी रायपूर येथून येताना ट्रकचा टायर का फोडला

म्हणून शिवीगाळ करण्यास सुरूवात केली. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यांना शिवीगाळ का करता असे म्हणताच आरोपी क्र.३ याने मला लोखंडी रॉडने डोक्यात मारले. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे माझ्या डोक्यात कपाळावर मार लागून डोके फुटले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ व २ यांनी मला टॉमीने पाठीत हातावर व पायावर मारून जखमी केले. हे म्हणणे खरे नाही की, मी आरडाओरड केल्याने धाब्यावरील लोक, वेटर आले त्यांनी व क्लिनर राजेश सुर्यवंशी सोडवासोडव केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना शिक्षा होऊ नये यासाठी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी पुरवणी जबाब माझ्या सांगण्याप्रमाणे घेतला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व माझ्यात तडजोड झाल्याने मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपींतर्फे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २९९ अन्वये राखीव**

श्रृवणोत्तर स्वीकृत, माझे समक्ष,

Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2026.01.02 16:47:07 +0530

दिनांक –०२.०१.२०२६ **(स्वानंदी दे. वडगांवकर)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहमदपूर.